# पाश्चात्य समाजातील शेतकरी प्रश्न

## उ प सं हा र

# उ प सं हा र

१) प्रास्ताविक:

इंग्रजी राजवटीत निर्माण झालेल्या वासाहतिक समाजामध्ये शेती प्रश्नाला महत्त्वाचे स्थान होते. कारण या समाजात खरी पिळवणूक शेतकऱ्यांची झाली. म.फुले व लो.टिळक हे त्या काळातील कर्ते पुरुष. त्यांनी हा प्रश्न कसा समजावून घेतला हे अभ्यासण्याचा प्रस्तुत प्रबंधाचा उद्देश होता.

अ) सारांश:

प्रबंधाच्या पहिल्या प्रकरणात महाराष्ट्रातील शेती प्रश्नांची थोडक्यात ऐतिहासिक आर्थिक व सामाजिक पार्श्वभूमी देऊन इंग्रजी राजवटीचा शेतीच्या व्यवसायावर झालेल्या बदलाची नोंद घेण्याचा प्रयत्न केला आहे.

इंग्रज येण्यापूर्वी महाराष्ट्रातील शेतीव्यवस्था जुन्याच पध्दतीने चालली होती. पेशवाईत सरंजामदार, वतनदार, देशमुख, कुलकर्णी, पाटील यांच्यामार्फत शेतसारा वसुल केला जात होता. गावात बलुतेदार पध्दत अस्तित्त्वात होती. इंग्रजाच्यापूर्वी अनेक राजांनी महाराष्ट्रावरती राज्य केले पण येथील शेतीव्यवस्थेवर किंवा ग्रामव्यवस्थेवर त्याचा कोणताच परिणाम झाला नाही. सामाजिक परिस्थितीवर ब्राह्मण वर्गाचे पेशवाईत मध्ये पूर्णपणे वर्चस्व होते. पूजा, अर्चा देवधर्म या गोष्टीमुळे पेशवाईत समाज अधोगतीला गेला होता.

इंग्रज राजवट महाराष्ट्रात प्रस्थापित झाल्यावर येथील शेतीव्यवस्थेवर दूरगामी परिणाम घडून आले. इंग्रजांना शेतीतून जास्तीत जास्त शेतसारा मिळविण्यासाठी रयतवारी पध्दत लागू केली. या राजवटीत इतर उद्योगधंदे बंद पडल्यामुळे शेतीवरच सर्व बोजा पडला. यामुळे शेतक-याची अवस्था बिकट बनली. दुष्काळ व वाढता सावकारी वर्ग यामुळे शेतकरी त्रस्त झाला. यामुळे १९व्या शतकाच्या उत्तरार्धात शेती प्रश्नावर चर्चा होऊ लागली.

दुस-या प्रकरणात म. जोतीराव फुले व महाराष्ट्रातील शेती-प्रश्न यासंबंधी सविस्तर चर्चा करण्यात आलेली आहे. महाराष्ट्रातील शेतीप्रश्नांचा सर्वअंगाने विचार करण्याचा पहिला क्रांतीकारक प्रयत्न म. फुले यांनी केला. म. फुलेनी आपले विचार सत्यशोधक समाज स्थापन करून त्या मार्फत सर्वमहाराष्ट्रभर पसरविले. शेतक-यांना त्यांच्या हक्काविषयी जागृत करून ब्राह्मणेत्तरांची चळवळ उभी केली.

शेतक-यांच्या आर्थिक शोषणाला म.फुलेनी सर्वस्वी ब्राह्मण वर्गाला जबाबदार धरले. त्यांचे असलेले समाज व प्रशासन व्यवस्थेवरील वर्चस्वामुळे शेतकरी गरिब बनला असे म.फुलेंचे मत होते. अशिक्षित व अज्ञानीपणाचा फायदा उठवून भरमसाठ व्याजाने कर्ज देऊन सावकार वर्ग ही शेतक-याच्या हालाखीस कारणीभूत ठरला. काही प्रमाणात ब्राह्मण नोकरशाहीच्या नादाने इंग्रज सरकारनेही शेतक-यांची पिळवणूक केली असे फुल्यांचे मत होते. मात्र इंग्रजांच्या औदार्यावर त्यांचा विश्वास होता. शेतक-याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्यांनी काही मूलगामी उपाय योजना सुचविल्या. तसेच शेतक-यांची आर्थिक शोषणातून मुक्तता करण्यासाठी "बळी राज्याची" कल्पना मांडली व यासाठी इंग्रजाचे

सहाय्य घेण्याची कल्पना मांडतात. या प्रकरणाच्या शेवटी फुलेंच्या विचाराचे परिक्षण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचा ब्राह्मणांविषयीचा दृष्टीकोन एकांगी स्वरुपाचा होता. मात्र याला त्याकाळची परिस्थितीच बरीचशी जबाबदार आहे. शेतक-याच्या प्रश्नाविषयी म.फुलेंचे योगदान हे महत्त्वाचे आहे. त्यामुळेच शेतकरी वर्ग जागृत झाला व आपल्या हक्कासंबंधी संघटीत प्रयत्न करु लागला.

तिस-या प्रकरणात लोकमान्य टिळक आणि महाराष्ट्रातील शेतीप्रश्न यासंबंधीची चर्चा केली आहे. लो.टिळक हे जहाल राष्ट्रवादी नेते असून ही त्यांनी बहुसंख्य शेतकरी वर्गाला राष्ट्रीय चळवळीत समाविष्ट करुन घेण्याचा आग्रह धरला व त्यांच्या दुरावस्थेची आपल्या केसरी या वर्तमान पत्रातून मीमांसा केली. वासाहतिक समाजातील साम्राज्यशाही शोषणाची त्यांनी चर्चा केली. लो.टिळकांनी आपले तत्कालीन शेती विषयक विचार मांडून सरकारच्या साम्राज्यवादी धोरणाव शेतक-यांच्या आर्थिक शोषणास कारणीभूत धरले आहे. सरकारचा वाढता शेतसारा निरनिराळे फंड, दुष्काळ उद्योगधंद्याचा अभाव यामुळे शेतकरी सर्वस्वी लुबाडला जात आहे. सावकारावर अव्यवहार्य नियंत्रण घालून शेतक-याला वेळेवर मदत करणारा त्याचा सहाय्यकारी तोडला या सर्वाला टिळक सरकारलाच दोषी ठरवितात. त्यांनी शेतक-याची परिस्थिती सुधारण्यासाठी काही उपाय सुचविले होते. लो.टिळकांची सरकारविरोधी भूमिका व सावकार वर्गाला झुकते माप देण्याचा प्रयत्न हे त्यांच्या राजकारणाचा एक भाग होता. खरे तर ज्याप्रमाणे सरकार शेतक-यांच्या शोषणास कारणीभूत होते त्याचप्रमाणे येथील सरकारला सहाय्यभुत ठरणारा जमीनदार सावकार हि त्यास बराच जबाबदार होता. शेतक-

-यांना त्यांच्या प्रश्नावर संघटीत करून राष्ट्रीय चळवळीला संघटीत रूप आणण्याचा मुख्य उद्देश यापाठीमागे टिळकांचा होता. शेतीचा व अर्थकारणाचा भांडवली विकास करणे हे त्यांच्या विचारांचे सूत्र होते.

चौथ्या प्रकरणात म. फुले व लो. टिळक यांच्या शेती प्रश्नावरील विचारांचा तुलनात्मक अभ्यास करण्याचा केला आहे. यामध्ये त्यांच्या विचारातील साम्य भेद व महत्त्व तपासले आहे.

म. फुले यांचे या प्रश्नावरील विचार व कार्य हे टिळकांच्या अगोदर व्यक्त झालेले आहेत. म. फुलेनी ब्राह्मणेत्तरांची चळवळ उभी करून सरकारच्या मदतीने त्यांचे प्रश्न सोडवून घेण्याचे प्रयत्न केलेत. शेतक-यांच्या दैन्यावस्थेस कारणीभूत असलेले घटक शोधून त्यावर उपाय योजना सुचविल्या व शेतक-यांच्या मुलासाठी सक्तीच्या शिक्षणाची आवश्यकता प्रतिपादली पुरोहित वर्गाचे व सावकाराचे प्राबल्य कमी करण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादली. लो. टिळक हे राजकीय पुढारी होते त्यांनी राजकीय लढा संघटीत करीत असताना शेतक-यांच्या पाठिंब्याची आवश्यकता वाटली व यातूनच त्यांनी शेतक-यांच्या दारिद्र्याची कारणे शोधण्याचा प्रयत्न केला व त्यांच्या पिळवणुकीस सरकारलाच जबाबदार धरले.

म. फुले व लो. टिळक या दोघांच्या विचारात साम्य व भेद आहेत. शेतक-यांची दैन्यावस्था व त्यावर करावयाची आर्थिक उपाय योजना याबाबत त्यांच्यात एकमत असले तरी त्यांच्या राजकीय स्वरूपाबाबत मतभेद आहेत. कारण फुल्यांचा उद्देश शेतक-यांची सर्वच गुलामगिरीतून मुक्तता करून शेतक-यांचे आदर्श राज्य स्थापिणे हा होता. टिळकांना इतक्या मुलभूत सुधारणा अभिप्रेत नव्हत्या. शेतक-याच्या दैन्यास फुल्यांनी ब्राह्मण वर्गास सर्वस्वी जबाबदार धरले तर लो. टिळकांनी देशी शोषकांना झुकते माप देऊन इंग्रजानाच जाबादार धरले. फुले व टिळक यांच्या

विचारात हा एकांगीपणा आला याचे कारण त्याकाळातील सामाजिक व राजकीय परिस्थिती होती.

ब) महाराष्ट्रातील शेतीप्रश्न काही विचार:

पेशवेकालीन शेती पध्दत व इंग्रज कालातील शेती व्यवस्थेतील मागासलेपणामुळे शेतक-याची आर्थिक कुचंबणा होत होती यावर त्या-काळातील समाजसुधारक, राजकारणी लोकांनी आपले विचार प्रकट केले आहेत. प्रत्यक्ष कृती केली आहे त्यामध्ये म.फुले व लो.टिळक यांचा प्रामुख्याने सहभाग होता.

१) महात्मा जोतीराव फुले:

शेतक-यांच्या आर्थिक दुरावस्थेला प्रथम वाचा फोडण्याचे महत्त्वाचे कार्य म. फुलेने केले आहे. शेतक-याची आर्थिक स्थिती सुधारावी म्हणून त्यांनी उपाय योजना सुचविल्या. कामगारांची संघटना फुले यांचे सहकारी नारायण लोखंडे यांनी बांधली. म.फुले यांनी सुचविलेल्या उपाय योजना. उदा. सुधारित बी-बियाणे, खते, उपकरणे, मशागती या सा-या बाबत त्यांनी आपली दृष्टी अनुकरणीय ठेवली होती. पाटाचे पाणी कालव्याचे पाणी शेतीला दिल्यास जमीन नापीक होते म्हणणारा शेतकरी तेच पाणी मिळविण्यासाठी आज भांडावयास उभा राहातो. यातील विरोध म. फुले यांच्या विचारांचे महत्त्व सिध्द करतो. शेतीबरोबर जोड उद्योगधंद्याची कल्पना प्रथमत: फुले यांनीच मांडली. त्यासाठी सुधारित जातीच्या शेळया-मेंढयांची निपज सुचविली. आज हेच जोड धंदे मोठयाप्रमाणात सुरु आहेत. कुक्कुटपालन लोकरीची पैदास, संकरीत गायीची निपज ही त्याचीच

उदाहरणे. शेती क्षेत्रातील आजचा बराचसा विकास त्यांनी घालून दिलेल्या मार्गावर चालू आहे.

शेतकरी व कामगारांचे शोषण थांबविणे, स्त्रियांचे आणि शूद्रातिशूद्रांचे वाजवी हक्क त्यांचे त्यास मिळवून देणे, त्यांना शिक्षण देणे, अस्पृशता निवारण, जातीभेदाविरुद्ध लढा, ब्राह्मणपुरोहिता-विरुद्ध बंड इत्यादी महत्त्वाचे कार्यक्रम. फुलेच्या नेतृत्वाखालील सत्यशोधक चळवळीने व पुढे ब्राह्मणेत्तर चळवळीने केले.

शेतक-यांनी राजकारणात भाग घेऊन सत्ता आपल्या हातात घ्यावी असे फुले यांचे मत होते. फुले यांनी सुरु केलेल्या ब्राह्मणेत्तर चळवळीतून हे कार्य काही प्रमाणात पार पडले. शेतक-यांचा मुलगा मुख्यमंत्री झाला पण त्यामुळे शेतक-यांचे प्रश्न मात्र सुटले नाहीत. पण विकासाचा नवा मार्ग त्यांनी दाखवून दिला.

२) लो. टिळकांची परंपरा:

लो.टिळकांनी वासाहतिक समाजात साम्राज्यवादी साकार विविध मार्गांचा अवलंब करुन शेतक-यास कशा प्रकारे लुटीत आहे. अर्थशोषण करीत आहे याचे प्रत्ययकारक चित्र त्यांनी रेखाटले. त्यासाठी स्वराज्याची मागणी केली. शेतक-यांवरील आपत्ती दूर करण्यासाठी अनेक उपाय-योजना सुचविल्या धंदे शिक्षण, सुधारित शेती, शेतीशाळा व कॉलेजेस स्थापिणे उद्योग व शेती यांच्यातील परस्पर संबंध याचा त्यांनी विचार केला. सहकारी तत्त्वावर साखर कारखाने स्थापिण्याची कल्पना त्यांनीच प्रथम मांडली. शेतीच्या भांडवली विकासावर त्यांनी जास्त भर दिला.

लो. टिळक हे राजकीय पुढारी होते. त्यामुळे त्यांचे विचार हे राजकीय स्वरूपाचेच होते, राजकारणात बहुमताला महत्त्वाचे स्थान असते. याची जाणीव लो. टिळकांना पूर्ण होती व यातूनच त्यांनी शेतक-यांचे प्रश्न हाती घेऊन त्यांच्या आर्थिक शोषणाविषयी जागृती करण्याचा प्रयत्न केला. यासाठी केसरीतून सविस्तर लेखन करून शेतक-यांच्या मध्ये राजकीय जागृती निर्माण केली. राजकीय जागृती शिवाय शा शेतकरी आपल्या प्रश्नावर संघटीत लढा देण्यासाठी तयार होणार नाहीत याची जाणीव टिळकांना होती म्हणूनच त्यांनी राजकीय जागृती केली. शेतक-यांना राजकीय अधिकाराशिवाय ख-या अर्थाने शेतक-यांची [illegible] उन्नती होणार नाही याची जाणीव शेतक-यांना टिळकांनीच प्रथम दिली. हे राजकीय अधिकार मिळविण्यासाठीच त्यांनी शेतक-यांना राष्ट्रीय चळवळीकडे प्रथम वळविले. शेतक-यांची राष्ट्रीय चळवळ उभी करण्याचा प्रयत्न व शेतकरी व राष्ट्रीय काँग्रेसची सांगड घालण्याचा प्रयत्न टिळकांनी केला. शेतक-यांच्यावरती एखादी आपत्ती कोसळल्यास शेतक-यांनी कोणत्याप्रकारची चळवळ उभी करावी याविषयी टिळकांनी दुष्काळाच्या निमित्ताने शेतक-यांना जाणीव करून दिली. सरकारने ज्या काही सवलती दिल्या असतील त्या पदरात पाडून घेण्यासाठी शेतक-यांना चळवळ करण्यास त्यांनी प्रवृत्त केले. त्याचा फायदा आजही शेतकरी घेत आहे. शेतक-यांनी स्वत:चे हक्क मिळविण्यासाठी चळवळ करून राजकीय दडपण आणणे हे महत्त्वाचे सूत्र टिळकांनी शेतक-यांना दिले. राजकीय दडपण जेवढया संघटीतपणे आणले जाईल तेवढया प्रमाणात शेतक-यांचे प्रश्न सुटतील असा विश्वास शेतक-यांचे मध्ये टिळकांनी निर्माण केला. आजही शेतकरी स्वत:चे प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय दडपणाचा वापर करतात.

थोडक्यात म.फुले आणि लो.टिळक यांनी शेतक-यांच्या आर्थिक प्रश्नावरती चर्चा केली आहे व त्यांचे प्रश्न सोडवण्यावरती उपायही सुचविलेले आहेत. दोघांनाही शेतक-याच्या प्रश्नाविषयी आस्था होती. मात्र लो.टिळकांच्या अगोदर फुलेंनी शेतक-यांच्या प्रश्नावरती विचार मांडले होते. लोकशाहीमध्ये बहुमताचा प्रश्नही त्यांनी टिळकांच्या अगोदर राष्ट्रीय काँग्रेसच्या संदर्भात चर्चिला होता. म. फुले यांनी सामाजिक प्रश्न सोडविताना शेतक-यांचा प्रश्न हाती घेतला व सामाजिक अन्याय कमी करण्यासाठी म.फुलेंना शेतक-यांचे प्रश्न महत्त्वाचे वाटलेत. त्यांनी शेती प्रश्नाचे सर्वांगीण स्वरूप शेतक-यास पटवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या आदर्श राज्याच्या "युटोपिया" मुळे ते समाजवाद्यांना जास्त जवळचे आहेत. टिळक मात्र भारतातील भांडवली विकासाचे खंदे पुरस्कर्ते होते, वासाहतिक समाजात तसा विकास इंग्रज घडवून आणू देत नाहीत म्हणून ते त्यांचे विरोधक होते. त्याला प्रागतिक राष्ट्रीय आधार होता.

:::::

## जोतीरावांची ग्रंथसंपदा

| | | |
|---|---|---|
| १) | तृतीय रत्न (नाटक) | पुणे १८५५ |
| २) | पोवाडा छत्रपती शिवाजी राजे भोसले यांचा | मुंबई १८६९ |
| ३) | ब्राह्मणांचे कसब | मुंबई १८६९ |
| ४) | गुलामगिरी | पुणे १८७३ |
| ५) | शेतक-यांचा आसूड | पुणे लेखन काळ १८८३ |
| ६) | सत्सार, अं:- १, २. | पुणे १८८५ |
| ७) | इशारा | पुणे १८८५ |
| ८) | सार्वजनिक सत्यधर्म पुस्तक | मुंबई १८९१ |
| ९) | अखंडादि काव्यरचना (स्फुट) | पुणे |

सप्तखंडात्मक समग्र टिळक वाङ्‌मय

खंड १ गीता रहस्य ब्रह्मसूत्र वृत्ति

खंड २ -

खंड ३ राजकीय लेखसंग्रह, इंग्रजी राज्याची समीक्षा, शिक्षण, शेती व शेतकरी, खोत हक्क, दुष्काळ निवारण, आर्थिक धोरण, औद्योगिक विकास, नोकरशाही संघर्ष.

खंड ४ नवे नेतृत्व,- राष्ट्रीय उत्सव स्वराज्याचे आंदोलन, मवाळांशी संग्राम- दडपशाहीचा प्रतिकार- प्लेग निवारण्याचा उपाय- वृत्तपत्राचा लढा- शासकीय सुधारणा- घटनात्मक प्रगति- स्थानिक स्वराज्य संस्था- संस्थानी राज्यकारभार- ब्रिटीश साम्राज्यशाही आशियातील राजकारण.

खंड ५ समाज व संस्कृति- समाज परविर्तन- स्त्रीकार्यांची सुधारणा- धर्मविचार- परधर्मियांची समस्या- राजकीय तत्वज्ञान- भाषा शास्त्र वाङ्‌मय समीक्षा- इतिहास संशोधन- शास्त्रमीमांसा व्यक्तिचित्रे.

खंड ६ जीवनध्येय- आत्मकथन, मुलाखती - न्यायालयीन अभियोग- निवडक पत्रे- कॉंग्रेस मधील व प्रांतिक समतोल- भाषणे- स्वराज्य संपादनाचे मार्ग-होमरूल लीगचा प्रचार- स्वदेशी" औद्योगिक उत्कर्ष- कामगार संघटना- दारुबंदी- राष्ट्रीय उत्सव- राष्ट्रीय जागृति- राज्यशास्त्र- राज्यकारभारावर टीका- सैन्यभरती- महाराष्ट्रातील हिंदू लोक- समाज सुधारणा- धर्म व तत्वज्ञान- गीता आणि गीतारहस्य- ज्योतिष संमेलन- शिक्षण- इतिहास- प्रवास वर्णन- व्यक्तिवर्णन- हिंदी भाषणे.

परिशिष्टे - ५

परिचय

उल्लेख सूची

खंड ७ Towards Independance : Personal-Judiciel Cases Evidence - Manifestoes - Articles and statements- Petitious - Interview - Speeches - Congress- Industrial coferences ect - Letters

Appendices.